# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 18/06/2021 (शुक्रवार)

(दुपार)

---

### खून

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर ऐरंडा शिवार काटोल येथे दिनांक 17/06/2021 चे 13.00 वा. ते 13. 15 वा. दरम्यान आरोपी क्र. 1. गोपाल मधुकर गाढवे, वय 29 वर्ष, व 2. प्रफुल मधुकर गाढवे, वय 27 वर्ष, दोन्ही रा. पारडसिंगा यांनी संगनमत करून शेतातील तारेच्या कुंपणाच्या व शेत धुऱ्याच्या कारणावरून फिर्यादी नामे– हर्षल अशोकराव गाढवे वय 18 वर्ष, रा. पारडसिंगा व त्याचे वडील नामे– अशोकराव बाबुराव गाढवे (मृतक)वय 40 वर्ष, रा. पारडसिंगा यांचे सोबत वाद करून फिर्यादी चे वडीलास जिवे मारण्याचे उद्देशाने कुऱ्हाडीने व काठीने डोक्यावर मारून गंभीर जखमी केले. फिर्यादीचे वडील हे जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रूग्णालय काटोल व नंतर लता मंगेशकर हॉस्पीटल हिंगणा येथे नेले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 302, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री आकाश शाही मो क. 9881281071 हे करीत आहे.

### घरफोडी

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 02 कि. मी अंतरावर वार्ड क्र. 2, विवेकानंद नगर कन्हान येथे दिनांक 14/02/2021 चे 13.00 वा. ते दिनांक 17/06/2021 चे 15.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ग.भा. रत्नमाला लक्ष्मणजी तांडेकर, वय 58 वर्ष, रा. वार्ड नं. 2 विवेकांनद नगर कन्हान हिने आपले घराचे दाराला कुलुप लावुन मुलीकडे गेली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने तिचे घराचे चॅनल गेट चे कुलुप तोडुन व लाकडी दरवाजाचा कडीकोंडा तोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने बेडरूम मधील लोखंडी अलमारीचे लॉकर मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने किं. 1,95,665/–रू. व चांदीचे सिक्के किं. 1,000/–रू. व नगदी 25,000/–रू. असा एकुण किं. 2,21,665/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री जावीद शेख पो स्टे कन्हान 9403692766हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 03 कि. मी अंतरावर जानकी नगर पंचवटी काटोल येथे दिनांक 16/06/2021 चे 22. 00 वा. ते दिनांक 17/06/2021 चे 07.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अनिल वासुदेव केने, वय 44 वर्ष, रा. जानकी नगर पंचवटी काटोल हे परिवारासह घराचे हॉलमध्ये झोपले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे मागील रुमचे लाकडी दार तोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने बेडरुम मधील कपाटातील नगदी 32,000/–रु. व एका पिवळया रंगाचे छोटया पर्समध्ये ठेवलेले सोन्याचा एक तोळयाचा गाप 10 वर्षापुर्वी घेतलेला किमती अंदाजे 20,000/–रु. असा एकुण कि. 52,000/– रुपयाचा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री बोंद्रे 9823904141 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर